**क्रमांक : ९९.**

**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पत्रक भाग दोन**
**मंगळवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ / श्रावण २५, १९४४ (शके)**

**१००. म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०२२ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना पूर्णत: ONLINE पध्दतीनेच दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ पासून **AMOIS** या संगणकीय प्रणालीवर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु झाल्यापासून म्हणजेच सकाळी ९.३० वाजल्यापासून स्विकारण्यात येतील व विधानपरिषद सभागृहाची नियमित बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर बंद करण्यात येतील.

२. **ONLINE** पध्दतीने प्राप्त होणाऱ्या सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल.

३. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचनेचा विषय हा निकडीचा सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश २ ते ३ ओळींमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नांव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

४. म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १६ ऑगस्ट, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

२/-

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

६) संगणक कक्ष (WEBSITE)

७) एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.

---------